महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

क्र. मासंवि/मावक/न.क्र.३७/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४००.०१९.
email : managerbcr@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५०४ दि. ०७ / ०४ / २०१५

**विषय :** शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.)आणि विशेष मागास प्रवर्ग-अ (एस.बी.सी.-ए) करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारीत बिंदु नामावली विहीत करणेबाबत.

**संदर्भ :** प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९५ दि. ३१/०७/२०१४

..................

शासनाने सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. XIII व XIV दि. ९ जुलै २०१४ अन्वये **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.)** व **विशेष मागास प्रवर्ग-अ (एस.बी.सी.-ए.)** निर्माण करुन सदर अध्यादेशानुसार सरळसेवेच्या पद भरतीमध्ये इ.एस.बी.सी. प्रवर्गाकरिता १६% व एस.बी.सी.-ए. प्रवर्गाकरिता ५% आरक्षण विहीत करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब दि.२९/०३/१९९७ अन्वये विहीत केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सुधारणा करुन सरळसेवा भरतीच्या पदासंदर्भात सुधारीत बिंदु नामावली विहीत करण्यात आलेली आहे. सदरहु शासन आदेश व शासन निर्णय या कार्यालयाचे प्रशासकीय परिपत्रक क्र. ४९५ दि. ३१/०७/२०१४ अन्वये प्रसारीत केलेले आहेत.

२. आता या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. १४/११/२०१४ च्या आदेशान्वये महाराष्ट्र अध्यादेश क्र. XIV दि. ९ जुलै २०१४ मधील कलम ४ (१) मधील राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवामधील सरळसेवा प्रवेश नियुक्त्यांमधील ५% नियुक्त्या विमाप्र-अ करिता राखून ठेवण्याच्या तरतुदीस अंतरिम स्थगिती दिलेली आहे. या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर न झाल्याने सदरचा अध्यादेश दि. २३/१२/२०१४ रोजी व्यपगत झालेला आहे. त्याबाबत शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब, दि. ०२/०३/२०१५ अन्वये प्रसारीत करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

३. तसेच सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग (इ.एस.बी.सी.) आरक्षणाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे शासन निर्णय क्र. बीबीसी-२०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब, दि. २१/०२/२०१५ अन्वये सदर निर्णयाची अंमलबजावणी दि. १४/११/२०१४ पासून स्थगित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णयामधील सूचना/तरतुदीचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी सर्व संबंधीत अधिकाऱ्यांनी दि. २१/०२/२०१५ व दि. ०२/०३/२०१५ च्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे व सदर निर्णयामधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर शासन निर्णय कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(सदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता मा. उच्च न्यायालयाच्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब**

मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

दिनांक : २१ फेब्रुवारी, २०१५.

<u>वाचा:-</u>

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४.

२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/ मावक, दि.१५ जुलै,२०१४.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब, दि.२४.७.२०१४.

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश २०१४ **(सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३)** अन्वये **"शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग"** निर्माण करण्यात आला आहे. सदर अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार या प्रवर्गास सरळसेवेच्या पदभरतीमध्ये १६ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. उक्त अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक २ येथील दिनांक १५ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षण दिलेले आहे.

उक्त अध्यादेशातील कलम ८ (१) नुसार संदर्भाधिन क्र. २ येथील दि.२४.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सुधारित बिंदुनामावली विहित करण्यात आलेली आहे.

**सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३** या अध्यादेशाच्या विरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.२०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत.या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये सदर अध्यादेशास अंतरिम स्थगिती दिलेली आहे. सदर निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात शासनामार्फत विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १८.१२.२०१४ च्या आदेशान्वये सदर विशेष अनुमती याचिका खारीज केली असून मा. उच्च न्यायालयाच्या दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये दिलेली अंतरिम स्थगिती कायम ठेवली आहे. तसेच महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ चे कायदयात रूपांतर होऊन महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१४, ( महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ ) अस्तित्वात आला आहे त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- या शासन निर्णयान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.१४.११.२०१४ रोजीचे स्थगिती आदेश विचारात घेऊन शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे. :-

**अ)** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १५ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयातील शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गातंर्गत मराठा समाजास शासकीय/निमशासकीय सेवा ( सरळसेवा भरतीसाठी ) व शैक्षणिक संस्थांमध्ये १६ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पासून स्थगित करण्यात येत आहे.

शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि कृषी व पशु संवर्धन विभागांतर्गत शासकीय तसेच खाजगी अनुदानित व विना अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त १६ टक्के आरक्षण शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गांतर्गत मराठा समाजास देण्याबाबतची तरतूद दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पासून स्थगित करण्यात येत आहे.

**ब)** सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक ३ येथील दिनांक २४ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पासून स्थगित करण्यात यावी. दि. १४ नोव्हेंबर, २०१४ नंतर शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीकरीता पूर्वीच्या आदेशांनुसार विहित केलेल्या १०० बिंदुनामावलीचा वापर करुन ही पदे भरण्याची कार्यवाही करावी.

**क)** मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिलेल्या स्थगिती आदेशापूर्वी, शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश अबाधित राहतील.

**ड)** दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पूर्वी, शासकीय/निमशासकीय सेवेमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाच्या आधारे उमेदवारांच्या नेमणुका झाल्या असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून त्या नेमणुका कायम राहतील.

**इ)** दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाच्या आधारे, शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना व शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही संबंधित विभागांनी करावी.

**ई)** दि. १४ नोव्हेंबर २०१४ नंतर शैक्षणिक संस्थामध्ये द्यावयाच्या प्रवेशांबाबत शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी आरक्षण वगळता प्रचलित आदेशांनुसार कार्यवाही करावी.

**प)** शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास अशी पदे मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत भरण्यात येऊ नयेत. अशी पदे भरण्याबाबतचा निर्णय मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर घेण्यात येईल. मात्र शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग वगळता उर्वरित पदे सदर जाहिरातीनुसार भरण्याची कार्यवाही करावी. कारण अशा बहुतांश प्रकरणात निवड प्रक्रिया सुरु झालेली असेल किंवा शेवटच्या टप्प्यात असल्यामुळे अशा जाहिराती रद्द करुन पुन्हा नव्याने जाहिरात देणे प्रशासकीय दृष्टया उचित ठरणार नाही.

**फ)** दि. १४ नोव्हेंबर २०१४ नंतर शासकीय व निमशासकीय सेवा भरती करताना पूर्वीच्या आदेशांनुसार वेळोवेळी विहित केलेल्या १०० बिंदुनामावलीचा वापर करुन ही पदे भरण्याची कार्यवाही करावी.

उपरोक्त सर्व कार्यवाही ही मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.२०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात यावी

२. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,शासकीय अनुदान प्राप्त संस्था,विद्यापीठे,सहकारी संस्था , शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

३. सरळसेवेव्दारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत वरीलप्रमाणे शासन निर्णयाचे पालन करण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०/मावक, दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१५०२२११६४६०२८७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c819 1e7389cf75eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2015.03.07 13:52:37 +05'30'

**( टि. वा. करपते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५. मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६. सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

९. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व जिल्हाधिकारी,
१३.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१६.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२०.सचिव,राज्य माहिती आयोग,
२१.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२३.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२४.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२५.संचालक, समाजकल्याण, पुणे,
२६.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२७. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२८. संचालक, सेवायोजन, मुंबई,
२९.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३४.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३५.सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३६. निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********

**विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशानुसार करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक बीसीसी -२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४ /१६-ब**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
**दिनांक:- २ मार्च, २०१५.**

वाचा:-

१.सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४ व या अध्यादेशाबाबत दि.१४ जुलै, २०१४ चे शुद्धिपत्र.

२. शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अविवि२०१४/प्र.क्र.८१/का-७, दि.१९ जुलै,२०१४.

३. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१.

४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.

५. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४ /१६-ब, दि.२४.७.२०१४

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश,२०१४ **(सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१४)** अन्वये **"विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए)"** निर्माण करण्यात आला आहे, सदर अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार या प्रवर्गास सरळसेवेच्या पदभरतीमध्ये ५ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

उक्त अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार व अल्पसंख्याक विकास विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार सरळ सेवेच्या पदभरतीमध्ये विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सुधारणा करुन, उक्त अध्यादेशातील कलम ८ (१) नुसार संदर्भाधिन क्र.५ येथील दि.२४.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सुधारित बिंदुनामावली विहित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश,२०१४ **(सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१४)** या अध्यादेशाच्या विरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.२०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत.

या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये सदर अध्यादेशातील कलम ४ (१) मधील राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवामधील सरळ सेवा प्रवेश नियुक्त्यांमधील ५% नियुक्त्या विमाप्र-अ करिता राखून ठेवण्याच्या तरतुदीस अंतरिम स्थगिती दिलेली आहे. या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर न झाल्याने सदरचा अध्यादेश दि.२३.१२.२०१४ रोजी व्यपगत झालेला आहे. त्यास अनुसरुन शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**<u>शासन निर्णय:-</u> अ)** सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक ५ येथील दिनांक २४ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पासून स्थगित करण्यात येत असून, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/ ९७/१६-ब, दि. २९.३.१९९७ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीचा वापर करण्यात यावा.

**आ)** सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक ५ येथील शासन निर्णय, दिनांक २४ जुलै, २०१४ मधील कार्यपध्दतीनुसार, ज्या प्रकरणी भरती प्रक्रिया दिनांक १४.११.२०१४ पूर्वी पूर्ण झालेली नसेल, अशा प्रकरणी उपरोक्त मुद्दा क्रमांक (अ) मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबावी.

इ) दि २३.१२.२०१४.रोजी महाराष्ट्र अध्यादेश क्र १४.चे कायद्यात रुपांतर न झाल्यामूळे सदर अध्यादेश व्यपगत झालेला आहे, ही वस्तुस्थिती विचारात घेता, या विभागाचा संदर्भाधिन क्र ५ .येथे नमूद केलेला दि २४.७.२०१४.चा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे

२. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१५०३०२११५४४२४५०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9395c596b57a69fe04109b8c819 1e7389cff5eda3fac16c6f8263be7fbbd319d, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2015.03.07 13:22:32 +05'30'

**( टि.वा.करपते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१) राज्यपाल यांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५) मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७) मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

१६) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद,
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९) सचिव, राज्य निवडणूक आयोग,
२०) सचिव, राज्य माहिती आयोग,
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२३) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२४) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२५) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२६) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२७) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२८) संचालक, सेवायोजन, मुंबई,
२९) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३०) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३४) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३५) सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य,
३६) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********